''सांगली जिल्ह्यातील कृषी क्षेत्रातील महिला शेतमजुरांच्या आर्थिक आणि सामाजिक, स्थितीचा चिकित्सक अभ्यास: सन २०१० –११ ते २०२० –२१ "

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मानव्य विध्याशाखेतील अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती सादर करण्याच्या शोध प्रबंधाची रूपरेषा

❖ संशोधक ❖

अलका मारुती कचरे

(एम.ए.अर्थशास्त्र सह.प्राध्यापक)

❖ संशोधन मार्गदर्शक ❖

प्रा. डॉ. सुदाम वसंतराव पवार

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

सरस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर–४१३५१२

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ,नांदेड

मार्च २०२२

अनुक्रमणिका

अ.क्र	सामग्री	पान क्र .
१	प्रस्तावना	५
२	विषय निवड हेतू	६
३	संशोधनाची उदिष्टे	७
४	संशोधनाची गृहीतके	८
५	संशोधन पद्धती	८
६	तथ्य संकलन पद्धती	९
७	संशोधन कार्यक्षेत्र	१०
८	संशोधन कालावधी	१०
९	संशोधन व्याप्ती	११
१०	संशोधन मर्यादा	११
११	प्रकरण विभागणी	१३
१२	संदर्भ सूची	१५

- **प्रस्तावना–**

मानवी इतिहासात महिलांचा कृषी व्यवसायातील सहभाग प्राचीन काळापासून महत्त्वाचा असून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महिलांचे स्थान अतिशय महत्वाचे आहे. शेती हा व्यवसाय भारतासारख्या विकनशील देशाच्या अर्थवेवस्थेचा कणा मानला आहे. राष्ट्राच्या आर्धिक व सामाजिक विकासामध्ये शेती क्षेत्राचे अनन्य साधारण महत्वआहे. भारतातील ग्रामीण भागातील लोकांचा केवळ व्यवसाय नव्हे तर तो जीवन मार्ग आहे.प्राचीन काळापासून शेती व्यवसायात काम करणाऱ्या स्त्रियांची संख्याअधिक असून त्या शेतकरी किंवा शेतमजूर म्हणून काम करताना दिसतात महिला शेती व्यवसायातील व घरगुती कामे सुद्धा करताना दिसून येतात. शतकानुशतकांपासून महिला त्यांच्या कुटुंबासाठी विविध प्रकारचे कार्य करत असतात. त्या दिवसातील १६ तास काम करीत असतात. ग्रामीण भागातील स्त्रिया शेतात तर राबतातच पुन्हा घरच्या कामाची जबाबदारी संपूर्णपणे त्यांच पहात असतात.तसेच प्राचीन काळापासून महिला घरकामाची जबाबदारी पारपाडून पुरुषांना अन्य महत्त्वाच्या कामात मदत करतात. विशेषतः ग्रामीण भागातील महिलांची भूमिका महत्वपूर्ण दिसूनयेते. कारण घरातील सर्व कामे करून या महिला शेतीमध्ये पेरणी कापणी, मळणी,खुरपणी इत्यादी कामे करतात कृषी व्यवसायातील महिला कामगारांपैकी शेतमजूर महिलांचे प्रमाण अधिक होते. कृषी व्यवसायातील कामाचे स्वरुप लक्षात घेता महिलांचा शेती कामात अधिक सहभाग असल्याचे दिसून येते. शेतजमिनीच्या मशागतीपासून तर उत्पादन निघेपर्यंतच्या होणाऱ्या सर्वच कामात महिलांचा सहभाग सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत

असतो. त्यांच्या सहभागाची खरी सुरुवात घरापासूनच होत असते. घराशेजारी असणारा गोठा साफ करणे, दूध काढणे, जनावरांना चारा घालणे, खुरपणी, लावणी, पेरणी काढणी, वेचणी यासारखी सर्व कामे महिला करीत असतात. कृषी व्यवसायाला पुरक असणाऱ्या व्यवसायातही महिलांचे योगदान मोठ्या प्रमाणात आहे. रेशीम उद्योग, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय, शेळी, मेंढी पालन यासारख्या जोडव्यवसायातही महिला कार्य करताना दिसून येतात. कृषी विपणन क्षेत्र व ग्रामीण लघु उद्योगात देखील महिला मोठ्या प्रमाणात सहभागी असून शारीरिक श्रम करताना दिसून येतात. कृषी व्यवसायात महिलांचा सहभागही जमेची बाजू असून कृषी व्यवसाय हा महिलांवर आधारित व्यवसाय आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. तसेच महिलांना बऱ्याच सामाजिक आर्थिक समस्या भेडसावत आहेत. आजही महिला मुख्य प्रवाहात दिसून येत नाहीत म्हणूनच ग्रामीण भागातील महिलांची ओळख शेतमजूर म्हणूनच आहे. शेती व्यवसायात काम करणाऱ्या महिला असो की, पुरक व्यवसायात काम करणाऱ्या महिलांना ग्रामीण महिला उद्योजकांचा दर्जा प्राप्त झाल्यास ग्रामीण भागाचा कायापालट झाल्याशिवाय राहणार नाही. "महिला जेव्हा प्रगती करायला लागतात, तेव्हा कुटुंब, गांव, देश यांची प्रगती व्हायला लागते "असे भारताचे माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे मत होते. देशाच्या व राज्याच्या अर्थव्यवस्थेतील महिलांच्या कार्याला महत्त्वाचे स्थान असून त्याकडे दुर्लक्ष करणे चुकीचे ठरेल. म्हणून मी सांगली जिल्ह्यातील महिला शेत मजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थिती चा विषय निवडलले आहे.

- ## विषय निवड हेतू –

भारत हा कृषिप्रधान देश असून सन १९५१ पासून भारत सरकारने आर्थिक विकासाकरिता पंचवार्षिक योजनांना सुरुवात करून आर्थिक विकासाच्या दिशेने पहिले पाऊल टाकले. सन १९६५ च्या हरित क्रांतीने देशातील कृषी क्षेत्रातील संबंधित असणारा शेतमजूर मात्र आर्थिक व सामाजिक विकासापासून वंचित राहिला. कृषीक्षेत्राचा मुख्य सुत्रधार म्हणजे शेतमजूर शेतमजुरांचा आर्थिक विकास हा त्याला मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून असतो.कृषीक्षेत्रातील पुरुष शेतमजुरा सोबत स्वी शेतमजूरही महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडते. महिला शेतमजुरांचे साधारणपणे कुशल व अकुशल असे वर्गीकरण लक्षात घेता असे दिसूनयेते की, साधारणपणे शिक्षित व कुशल लोकांना उत्पन्न चांगले मिळते व त्यामुळे उत्पन्न वाढीमुळे बचत होताना दिसते तर अकुशल मजूरांच्या बाबतीत कामाचे स्वरुप हे हीन, कमी मजूरीचे त्यामुळे त्यांना उत्पन्न कमी मिळते व त्यांचे जीवनमानही आर्थिक हालाखीचे दिसून येते. मात्र त्यांना मिळणारे वेतनही कमी असते. त्यामुळे त्यांना हलाखीचे जीवन जगावे लागते. केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकारने शेतमजुरांकरिता विविध कल्याणकारी योजना, चौकशी समित्या स्थापन केल्या. पण मोजक्याच योजना त्यांच्या पर्यंत पोहचल्या. अकुशल मजूरांना अधिककाळ श्रम करूनही मिळणारा कमी मोबदला, त्यातूनदैनंदिन गरजा, मुलांचे शिक्षण ते पूर्ण करू शकत नाहीत. त्यामुळे ते दारिद्र्याच्या दृष्टचक्रात अधिक अडकले

जातात म्हणून मी या संशोधनात सांगली जिल्हयातील कृषि क्षेत्रातील महिला शेतमजुरी करणा ऱ्या स्त्रियांनचा
आर्थिक व सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास करणार असून महिलांना मजूरी व्यतिरिक्त दुसरे उत्पन्नाचे साधन उपलब्ध आहे का? त्यांना देण्यात येणारे वेतन योग्य आहे का? स्त्रियांच्या संख्यात्मक व गुणात्मक परिस्थितीचा अभ्यास त्यांचे समाजातील स्थान याचा अभ्यास करून त्यात सुधारणा करण्याच्या दृष्टीने एक प्रयत्न म्हणून सांगली जिल्ह्यामधील महिला शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा चिकित्सक आभ्यास सन २०1० ते २०२०_२१ या विषयाची निवड
करण्यात आली आहे.

- **उद्दिष्टे –**

१) सांगली जिल्हयामधील महिला शेतमजुरीच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
२)महिला शेतमजुराच्या बाबतीत कार्यक्षेत्रातील महिलांना
मिळणाऱ्या योजनांचे अध्यन करणे.
३) महिला शेतमजूरांच्या संख्यात्मक व गुणात्मक परिस्थितीच अभ्यास करणे.
४) महिला शेतमजुराच्या शेतमजुरी दरातील बदलाचे अध्ययन करने.
५) महिला शेतमजुरांसाठी असलेल्या सरकारी योजनांच्या अंबलबजावणीचा आढावा घेणे.

- **गुहितके –**

१) महिला शेतमजुरांच्या संख्येत वाढ झाली आहे व महिलांना हंगामी रोजगार मिळतो.
२) महिला शेतमजुरांच्या वाढीव उत्पन्ना मुळे त्यांच्या बचातीत वाढ होत आहे
३) महिला शेतमजुरांच्या शिक्षणाचे अल्प प्रमाण असल्यामुळे त्यांना आर्थिक हलाखीचे जीवन जगावे लागते.
४) कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञानाचा स्विकार केल्यामुळे भूमिहीन महिला शेतमजूरांना बेरोजगारीच्या सामोरे जावे लागते.

- **संशोधन पध्दती**:

कोणत्याही विषयातील संशोधन करत असताना संशोधन शास्त्रशुद्ध व्हावे,अचूक निष्कर्ष निघावेत प्रस्तुत संशोधन सामाजिक शास्त्रावर आधारित असल्याने सखोल अध्यन करण्यासाठी व संकलित तथ्यांवरील अहवालाची मांडणी

वाचकाला कळावी म्हणून वर्णनात्मक तसेच चिकित्सक अध्ययनाचे निष्कर्ष विश्लेषणात्मक पद्धतीने मांडले जातील हे अध्यन प्राथमिक आणि दुय्यम अश्या दोन्ही स्रोतावर आधारित असेल प्रत्यक्ष्य मुख्य भार प्राथमिक स्तोत्रावर असेल व निरीक्षन मुलाखत प्रश्नावली अनुसूची याचा वापर प्रस्तुत संशोधनात घेतला जाईल.

अ)नमुना निवड पध्दती

सांगली जिल्हयातील एकूण १० तालुके असून त्यातून ५ तालुक्यातून प्रत्येकी १० गावातून २० महिलांची निवड केली जाणार आहे. असे एकूण ५० गावातून १००० महिला शेतमजुरांचा अभ्यास करण्याकरिता निवड केली आहे. त्यांची प्रत्यक्ष निरीक्षन , मुलाखती , अनुसूची प्रश्नावली प्राथमिक साधनांच्या सहायाने तथ्य संकलन माहिती संकलित घेण्यात येणार आहे. अश्या एकूण १००० महिला शेतमजुरांची यादृच्छिक नमुना निवडीच्या वापर करणार असून सहेतूक नुमुन निवड वापरला जाणार आहे.

ब]तथ्य संकलन पद्धती:

या अभ्यासाकरिता संशोधकाने तथ्य संकलनाकरिता पुढील प्रमाणे प्राथमिक व द्वितीय तथ्य संकलन पध्दतीचा वापर केला आहे.

१) प्राथमिक स्त्रोतः

प्राथमिक माहिती ही निवड केलेल्या महिला शेतमजुरांना प्रत्यक्ष भेटून त्यांचे

निरीक्षण करून प्रश्नावलीद्वारे तथ्यांचे संकलन करण्यात आले.

२) द्वितीय स्त्रोतः

द्वितीय माहिती राज्य पातळीवरील विभागीय जिल्हा पातळीवरील माहिती, महाराष्ट्र राज्याचा सांख्यिकीय गोषवारा मानव विकास अहवाल, अहवाल, जिल्हा गॅझेट आर्थिक व सामाजिक समालोचन, वर्तमानपत्र, मासिके,प्रकाशित ग्रंथ ,गुगल ,इंटरनेट व इतर प्रकाशित माहितीचा वापर करण्यात येणार आहे.

- ## संशोधन कार्यक्षेत्र

प्रस्तुत संशोधन कार्यात सांगली जिल्हयातील महिला शेत मजुरांचा आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास संशोधनातून लागू करण्यात आली आहे . म्हणजेच प्रस्तुत अभ्यास संशोधनातून व्याप्ती सांगली जिल्ह्यापुरती मर्यादित असणार आहे .

- ## संशोधनाचा कालावधी:

प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासाकरिता (सन २०१० ते सन २०२०-२१) असा दहा वर्षाचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

- ## संशोधनाची व्याप्ती:

प्रस्तुत संशोधन कार्यात सांगली जिल्हयातील महिला शेतमजुरांचा आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास प्रस्तुत संशोधनातून लागू करण्यात येणार आहे .

संशोधनाची मर्यादा:

प्रस्तुत संशोधनातील माहितीचे संकलन, नमुना निवड पध्दतीने, प्रश्नावलीद्वारे किंवा मु लाखत, अनुसूचीद्वारे संकलित करण्यात येणार आहे. परंतु महिला शेतमजुरांच्या शिक्षणाचे अल्प प्रमाण, लाजाळूपणा व गोपनियता यामुळे माहिती संकलनावर मर्यादा येऊ शकते तसेच माहितीतील विश्वसनीय आकडेवारीचा अभाव, शासकीय गोपनीयता व माहितीच्या अपुरेपणामुळे माहिती संकलनावर मर्यादा पडते.

- शेतमजूर स्त्रियांच्या कौटुंबिक, आर्थिक व सामाजिक परिस्थितीचे अध्ययन:

दुसऱ्याच्या मालकीच्या शेतीवर अंगमेहनतीने काम करून जो मजुरी कमवितो तो शेतमजूर' अशी आपण शेतमजुराची व्याख्या करू शकतो. ही मजुरी म्हणजेच मोबदला.

हा मोबदला रोख पैशात वस्तुरूपात अथवा उत्पादनातील हिश्याच्या स्वरुपात असू शकतो. असे शेतमजूर तीन प्रकारचे आढळतात.

(1) भूमिहीन शेतकरी
(2) अल्प भूधारक
(3) अत्यल्प भूधारक

शेतमजूर स्त्रिया

शेतमजुरांचे वर्गीकरण केले तरी शेतमजूर पुरुष व स्त्रिया असे विभाजन करता येते. यात पुरुष शेतमजूर यापेक्षा स्त्रि शेतमजुरांना त्यांच्या कुटुंबाकडे अधिक लक्ष द्यावे लागते. घरात बऱ्याच वेळा अनेक समस्यांना तोंड देवून त्यांना त्यांचा संसार सांभाळावा लागतो. अनेक शेतमजूराचे वर्गीकरण केले तरी शेतमजूर पुरुष व स्त्रिया असे घरची व बाहेरच्या अशी दोन्हीही परिस्थिती सांभाळावी लागते. त्यांना समस्या असतात. त्या सर्व समस्या त्यांना भेडसावद असतात. त्या सर्व वेळा या शेतमजूर स्त्रियांच्या पतीचे निधन झालेले असते. अशा वेळेस त्यांना सर्व कुटुंबाला सोबत घेवून जगावे लागते. घरात कुटुंबाच्या उदरनिर्वाहाच्या, आरोग्याच्या शैक्षणिक अशा अनेक समस्या असतात. त्या सर्व समस्यांना एकट्या स्त्रीला एकटीला सामोरे जावून सोडवाव्या लागतात. या शेतमजूर स्त्रियां शेतमजूर होण्यामागे अनेक करणे असतात. ग्रामीण भागात उदरनिर्वाहाचे साधन शेती असते. पण बऱ्याच कुटुंबाकडे आवश्यक तेवढी शेती नसते. त्यामुळे दुसऱ्यांच्या शेतात जावून शेतमजुरी करावी लागते. केवळ पतीने कमावून आणलेले उत्पन्न पूर्ण कुटुंबासाठी पर्याप्त नसते. त्यामुळे स्त्रीला

शेतमजुरीकडे वळावे लागते. ग्रामीण भागात स्त्रिया शेतमजूर होण्याची कारणे तसेच त्यांना येणाऱ्या समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येतात.

स्त्री शेतमजूर होण्याची कारणे

१.गरिबी

२.शिक्षणाचा अभाव

३.रोजगाराच्या संधी

४.संयुक्त कुटुंब

५.घरातील सदस्य संख्येत वाढ

६.महागाई

७.इतर क्षेत्र अभाव

८.पतीला कमी मजुरी

९.पतीचे व्यसन

१०.पतीचा मृत्यू

शेतमजूर स्त्रीची समस्या

१ .कौटुंबिक समस्या

२ .आरोग्य विषयक समस्या

४ .आर्थिक समस्या

४ .सामाजिक समस्या

- **प्रकरण मांडणी**

- पहिले प्रकरण :

प्रस्तावना व संशोधन पद्धती .
प्रस्तुत प्रकरण प्रस्तावना व संशोधित संबंधित आहे. यात सांगली जिल्ह्यातील महिला शेतमजुरांची आर्थिक सामाजिक स्थिची प्रस्तावना ,संकल्पना,समस्या सुत्रण, संशोधनाची उद्दिष्टये, संशोधनाची गृहिते, विषय निवडीचा हेतू, संशोधन पद्धती,संशोधनाचा कालावधी, संशोधन व्याप्ती,संशोधन मर्यादा व प्रकरण मांडणी यांचा प्रस्तुत प्रकरणात समावेश केला जाणार आहे.

प्रकरण दुसरे :

संशोधन साहित्यांचा आढावा– भारतीय अर्थव्यवस्थेतील महिलांचा कृषी क्षेत्रातील स्थिती व संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे
भारतातील महिला शेतमजुरांची स्थिती, भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्त्व, भारतातील शेतमजुरांची स्थिती आणि विषयाला अनुसरून साहित्य वाडमयाचा आढावा घेण्यात येणार आहे. यात महिला शेतमजुरांविषयी ज्या विचारवंतांनी, लेखकांनी व संशोधकांनी जे अध्ययन केलेले आहे त्या संशोधन अध्ययनाचा गोषवाराचा आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण तिसरे :

सांगली जिल्ह्यातील महिला शेतमजुरांचा कृषी क्षेत्रातील सहभाग मजुरांचे उत्पन स्थान,भारतातील महिला शेतमजुरांची स्थिती या पैलूंचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे :

सांगली जिल्हयाची आर्थिक व सामाजिक स्थीचे वैशिष्टये सांगली जिल्हयाचे भौगोलिक स्थान व प्राकृतिक रचना,सामाजिक स्थिती, आर्थिक स्थिती, कृषी क्षेत्र,प्रशासकीय क्षेत्र, प्रशासकीय विभाग,जमीन,लोकसंख्या,पिकरचना,साक्ष्यरता,पशुधन अभ्यासशेतकरी उत्पन्न पायाभूत सुविधा इ आढावा घेण्यात येईल

प्रकरण पाचवे : सांगली जिल्हयातील कृषी क्षेत्रातील महिलाशेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास प्रस्तुत प्रकरण हे प्रश्नावलीवर आधारीत आहे. या प्रकरणात सांगली जिल्हयातील महिला शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे विश्लेषण करण्यात येणार आहे. संकलित करण्यात आलेल्या माहितीवरून महिला शेतमजुरांची शैक्षणिक स्थिती पूरक व्यवसाय , रोजगाराचे प्रमाण ,महिला शेतमजुरी जीवन मान ,महिला शेतमजुरांच्या मिळणारा आढावा, महिला शेतमजुरांचा संख्यात्मक आणी गुणात्मक स्थितीच आढावा , मजुरी दर, बचीतीचे प्रमाण इत्यादी आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे.महिला शेतमजुरांच्या सामाजिक स्थितीचा महिला शेतमजुरांची वैवाहिक स्थिती, शैक्षणिक स्थिती. पिळवणूक,

दारिद्रयाचे प्रमाण यांचा विश्लेषणात्मक पद्धतीचा अभ्यास करण्यात आला आहे.

प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी या प्रकरणामध्ये प्रस्तुत संशोधनातून निघालेल्या निष्कर्ष नोंदवून काही महत्वपूर्ण शिफारशी सुचवण्यात आहेत.

दारिद्रयाचे प्रमाण यांचा विश्लेषणात्मक पद्धतीचा अभ्यास करण्यात आला आहे.

प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी या प्रकरणामध्ये प्रस्तुत संशोधनातून निघालेल्या निष्कर्ष नोंदवून काही महत्वपूर्ण शिफारशी सुचवण्यात आहेत.

- ## संदर्भ सूची

१] मु .देसाई , [१९९८],भारतीय अर्थव्येवस्था,शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर .

२] भोसले[२०२२]शेती प्रगती नवी दृष्टीकोन नवी आभ्यास.इस्लामपूर.

३] राजू शेटी,[२०२२], नव्या पर्यावरणाच्या शेधात, शेती प्रगत मासिक,इस्लामपूर

४] प्रा के ए खतीब,[२०२०],लोकसंख्या भूगोल शिवाजी विद्यापीठ

५] फडणवीस मृणालिनी व देशपांडे ,श्रम अर्थशास्त्र २००२

६]कृषी मंडन , कृषी अर्थ्वेवस्था श्री मंगेश प्रकाशन नागपूर पू .क्र ३२२-.३०२१

७] अग्रवाल ए एन भारताचे शेती विषयक प्रश्न विकास प्रकाशन,१९९६

८] झामरे जी एन्,भारतीय अर्थशास्त्र ,विकास व पर्यावरनात्म्क अर्थशास्त्र